॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

'A' Grade
NAAC Re-accredited
(4th Cycle)

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. १३ जुलै : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे आयोजित विद्यापीठस्तरीय 'कुलगुरू युवा प्रेरणा शिबिर-२०२६' अंतर्गत आज १३ जुलै रोजी विद्यापीठातील प्रशासकीय कार्यालयाच्या भेटी दरम्यान कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी कुलगुरूंनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत शिबिरामध्ये सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती जाणून घेतली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्याची मोठी संधी विद्यार्थ्यांना मिळत असल्याचे सांगून त्यांनी प्लास्टिकमुक्त परिसर, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक जबाबदारी या विषयांवर प्रभावी जनजागृती करण्याचे आवाहन केले. पर्यावरण संरक्षण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांनीही विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी सांगितले की, विद्यापीठात आयोजित करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांना विद्यार्थ्यांचा नेहमीच उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो. 'कुलगुरू युवा प्रेरणा शिबिर' हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यात कायमस्वरूपी प्रेरणा देणारा अनुभव ठरेल. या शिबिरातील प्रत्येक दिवस विद्यार्थ्यांच्या स्मरणात राहील आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वात सकारात्मक बदल घडवून आणेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विद्यापीठातील विविध अभ्यासक्रम, संशोधनाच्या संधी आणि शैक्षणिक सुविधांची माहिती घेऊन विद्यार्थ्यांनी आपल्या भविष्यातील वाटचालीची दिशा निश्चित करावी, असे आवाहनही त्यांनी केले.

स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी विद्यापीठातील विविध प्रशासकीय विभागांना भेट देऊन विद्यापीठाचा प्रशासकीय कारभार, विविध विभागांची जबाबदारी तसेच कार्यपद्धतीची सविस्तर माहिती जाणून घेतली. विद्यार्थ्यांनी कुलसचिव कार्यालय, जनसंपर्क विभाग, परीक्षा विभाग तसेच वित्त व लेखा विभागांना भेटी देत संबंधित विभागप्रमुख व अधिकाऱ्यांशी संवाद साधला. प्रत्येक विभागाच्या कार्याची माहिती, विद्यार्थ्यांशी संबंधित सेवा, प्रशासनातील समन्वय आणि दैनंदिन कामकाजाची प्रक्रिया याबाबत अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.

प्रशासकीय विभागांच्या भेटीनंतर विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले. ज्या विद्यापीठाच्या अंतर्गत आपण शिक्षण घेत आहोत, त्या विद्यापीठाचा प्रशासकीय कारभार नेमका कसा चालतो, विविध विभागांचे कार्य काय असते आणि विद्यार्थ्यांशी संबंधित सेवा कशा दिल्या जातात, याची प्रत्यक्ष माहिती मिळाल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येक विभागातील अधिकाऱ्यांनी दिलेल्या सविस्तर मार्गदर्शनामुळे विद्यापीठ प्रशासनाविषयी अधिक विश्वास आणि समज निर्माण झाल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

.......................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: १३ जुलै, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता